# अधिसुचना

## उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, उमरखेड यांचे कार्यालय

क्रमांक /प्रस्तु-२./भूंस/अका/कावि/४३२ /२०१७ दिनांक:-०५ /०७/२०१७

(भूमिसंपादन,पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३)

**प्रकरण क्रमांक :- २८/४७/२०१५-१६ मौजा- बेलखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ**

ज्याअर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम - २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम -३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली अधिसुचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक. १९/०१/२०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम — ३ च्या खंड (झेड ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे जिचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा केला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोनमध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम - ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसुची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावीत)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे,

आणि ज्याअर्थी, कलम -४३ च्या पोट कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे, (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यास येत आहे की, उक्त अधिनियमाच्या **कलम — ११ च्या पोट कलम -४** अनुसार कोणतेही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाच्या कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उप्रोक्य तरतुदीचा प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम - ११ च्या पोट कलम – (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम – १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम – ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, तथा भुसंपादन अधिकारी उमरखेड यांना पदनिर्देशित करीत आहे.

**** अनुसूची - एक ****

**~ जमिनीचे वर्णन ~**

**गांव – बेलखेड　　तालुका – उमरखेड　　जिल्हा - यवतमाळ**

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|
| १ | २४/२ | ०.४० |
| २ | २४/२अ | ०.४६ |
| ३ | २४/१, २४/१ब | ०.३९ |
| ४ | २४/१अ | ०.११ |
| एकूण क्षेत्र - | | **१.३६** |

**** अनुसूची - दोन ****

**~ सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण ~**

**प्रकल्पाचे नांव** :- वर्धा–नांदेड,मार्गे यवतमाळ-पुसद-उमरखेड नवीन रेल्वे लाईन करीता.

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- वर्धा – नांदेड, मार्गे यवतमाळ - पुसद – उमरखेड नवीन रेल्वे लाईन चे सार्वजनिक कामाचे प्रयोजनार्थ.

**समाजाला मिळणारे लाभ** :- सार्वजनिक हितार्थ.

**** अनुसूची – तीन ****

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** :- विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक.